SYBmm-m (Intro to creative writing) 5/10/11.
PQ10ADN

वेळ : २.३० तास गुण : ७५

सूचना १) सर्व प्रश्न सोडवा.
२) उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.

प्रश्न १ ला : सर्जनशील लेखनातील कथा, कादंबरी आणि कविता या प्रकारांचे घटक सांगून यातील फरक उदाहरणांसह स्पष्ट करा. (१५)

प्रश्न २ रा : **अ.** खाली कथेचे सूत्र दिले आहेत. ते सूत्र वापरून स्वरचित कथा लिहा व ती कथा लिहिताना कथेच्या पुढील घटकांचा त्यात समावेश करा. . (१५)

(१) कथानक (२) पात्र (३) निवेदन (४) संघर्ष
(५) वातावरण (६) सूत्र.

**'ससा आणि कासव'**

किंवा

**ब.** खाली दिलेली कथा वाचून त्या कथेचे पुढील घटकांच्या आधारे त्या कथेचे विश्लेषण करा. (१५)

(१) सूत्र (२) कथानक (३) पात्र (४) निवेदक (५) संघर्ष (६) वातावरण.

सोनपूर गावात चंपकलाल हलवाई रहात होता. त्याचे मिठाईचे मोठे दुकान होते. मिठाईच्या दुकानातून नेहमी ताज्या मिठाईचा घमघमाट येत असे. रस्त्याने जाणारा येणारा माणूस मिठाईच्या वासाने क्षणभर थबकत असे.

एकदा रामू नावाचा एक गरीब मुलगा त्या हलवायाच्या दुकानाजवळून चालला होता. मिठाई पाहून तो दुकानाजवळ थांबला. गेले दोन दिवस तो उपाशीच होता. मिठाईच्या गोड वासाने त्याच्या तोंडाला पाणी सुटले, "वा, काय गोड वास आहे या मिठाईचा!" हे त्याचे उद्गार हलवायाने ऐकले, तेव्हा तो लोभी हलवाई म्हणाला, "ए मुला, मिठाईचा वास तू घेतलास ना, त्याचे पाच रुपये दे". मुलगा घाबरला. आता काय करावे, हेच त्याला कळेनासे झाले.

केवळ मिठाईचा वास घेतल्याबद्दल गरीब रामूकडून हलवाई पैसे मागतोय, हे

जवळच उभ्या असलेल्या चाणाक्ष नेने वकिलाने पाहिले. हलवायाला चांगलाच धडा शिकवावा असे ठरवून ते चंपकलाल हलवायाला म्हणाले, " या गरीब मुलाने घेतलेल्या मिठाईच्या वासाची किंमत मी तुला देतो". असे म्हणून नेने वकिलांनी आपल्या खिशातील नाणी खळखळून वाजवली. " ऐकलास ना नाण्यांचा आवाज, हीच त्या मिठाईच्या वासाची किंमत. मिळाली ना!" वकिलाच्या चातुर्याने हलवाई चांगलाच शरमला. त्याला योग्य धडा मिळाला.

प्रश्न ३ रा : **अ.** खाली दिलेली कविता वाचून पुढील घटकांच्या आधारे त्या कवितेचे विश्लेषण करा. (१५)

(१) सूत्र (२) भाषाशैली (३) कल्पनासृष्टी
(४) मांडणी (५) अलंकारसौंदर्य.

पाणी आटलेले
डोळयांतील आता
ग्रीष्म जाता जाता
पेटलेला

भेगाळलेले ओठ
डोहाच्या काठाचे
पाणी ही पाटाचे
दुभंगले

झाडे वेडी झाली
एका - थेंबासाठी
पक्षी नदीकाठी
कासावीस

धरणी कंठात
हुंदका कोरडा
कसा हंबरडा
उसवावा

P&10ADN

गहाण ठेवावी

वसुधा नभाशी

पोकळ ढगांशी

वाद नको

**किंवा**

ब. माहितीपट म्हणजे काय? ते सांगून माहितीपटाची प्रक्रिया, रचना व निवेदन उदाहरणांसह स्पष्ट करा (१५)

प्रश्न ४ था : **अ.** खाली दिलेल्या घटकांच्या आधारे **दोन** जाहिरात तयार करा.

(अ) गीत (ब) कल्पनारम्यता (क) संवाद

(ड) भाव (मूड) (इ) माहिती (ई) अलंकार सौंदर्य. (१५)

**१.** प्रवास कंपनीच्या मॉरिशिस टूरची जाहिरात तयार करा.

**२.** नवीन मोबाईल बाजारात दाखल होतोय त्याची जाहिरात करा.

**किंवा**

**ब.** तुम्ही पाहिलेल्या आणि अभ्यासलेल्या कोणत्याही एका चित्रपटाचे परीक्षण करा. (१५)

प्रश्न ५ वा : टीपा लिहा (कोणत्याही तीन) (१५)

१. बौद्धिक स्वामित्व हक्क.

२. नाटकातील संवादाचे महत्त्व.

३. ब्लॉग.

४. ई-वृत्तपत्रे.

५. माहितीपटाची वैशिष्ट्ये.